

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे मुखपत्र

# कोल्हापूर चेंबर पत्रिका

संपादक : ललित गांधी

POSTAL : REGN. DL. NO. KLP-302/2012-2014

वर्ष : ४ ◆ अंक : ०१ ◆ मे २०१२ ◆ पाने : ८ ◆ मुल्यः १० रू. वार्षिक मुल्य १०० रू.

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन

## संघटीत लढ्याचे लक्षणीय यश दागिन्यांवरील एक्साईज कर रद्द



केंद्र सरकारने दागिण्यांवरील एक्साईज कर मागे घ्यावा या मागणीसाठी सराफ व्यापाऱ्यांनी काढलेला भव्य मोर्चा .



श्री फत्तेचंदजी रांका

**मुंबई** – केंद्रीय अर्थमंत्री नाम. प्रणव मुखर्जी यांनी अर्थसंकल्पात दागिन्यांवर अबकारी कर लावण्याचे जाहीर करताच, देशभरातील सराफ व्यापाऱ्यांत प्रचंड खळबळ उडाली होती. महाराष्ट्र राज्य सराफ व्यापारी महासंघाने अध्यक्ष श्री फत्तेचंदजी रांका यांच्या नेतृत्वाखाली अभुतपूर्व आंदोलन करून आपली संघटीत शक्ती दाखवुन दिली व सरकारला हा निर्णय मागे घेणे भाग पाडले. श्री फत्तेचंदजी रांका यांचे कुशल व लढाऊ नेतृत्व व त्यांचे सर्व सहकारी अभिनंदनास पात्र आहेत. औरंगाबाद मध्ये हजारो सराफ व्यापाऱ्यांनी काढलेल्या अभुतपूर्व मोर्चा या संघटीत ताकदीचे सर्वोत्तम उदाहरण आहे.

## स्थानिक कराबाबत मा. मुख्यमंत्री यांना निवेदन



स्थानिक कराबाबत मा. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना निवेदन देवून चर्चा करताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी व अध्यक्ष आनंद माने शेजारी पुरूषोत्तम टावरी आदी.

**मुंबई** – राज्यातील 'ड' वर्ग महापालिकांना लागू केलेल्या नवीन स्थानिक संस्था कर प्रणालीला राज्यातील बहुसंख्य व्यापारी उद्योजकांनी विरोध केल्याने ही प्रणाली तात्काळ रद्द करण्याची मागणी कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष आनंद माने, उपाध्यक्ष ललित गांधी यांनी शिष्टमंडळासह मा. मुख्यमंत्री नाम. पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेऊन केली.

''ड'' वर्ग महानगरपालिकांना लागू केलेला स्थानिक संस्था कराबाबत व्यापारी उद्योजकांचा विरोध लक्षात घेऊन याबाबत फेर विचार करण्यासाठी लवकरात लवकर उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्याचे आश्वासन मा. मुख्यमंत्री नाम. पृथ्वीराज चव्हाण यांनी कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड इन्डस्ट्रीज च्या शिष्टमंडळाला दिल

### ⊡ संलग्न संस्थांना आवाहन ⊡

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजच्या संलग्न संस्थांनी त्यांच्या विविध उपक्रमांच्या बातम्या कोल्हापूर चेंबरकडे पाठवाव्यात, त्यांना 'कोल्हापूर चेंबर पत्रिक'ा मध्ये योग्य प्रसिध्दी देण्यात येईल.

**- संपादक**

KCCI
कोल्हापूर चेंबर पत्रिका



ललित गांधी

# संपादक

सादर नमस्कार,

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲन्ड ॲग्रीकल्चर' (MACCIA) या संस्थेची द्वैवार्षिक निवडणुक प्रक्रिया सुरू आहे.

पश्चिम महाराष्ट्र विभागातुन 'उपाध्यक्ष' पदासाठी मी माझी उमेदवारी जाहीर केली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक यांच्यासमोरील विविध अडचणी, समस्या सोडविण्याबरोबरच व्यापार-उद्योग विकासासाठी विविध स्तरावर प्रयत्न करणे, शासन दरबारी मग ते राज्य सरकार असेल अथवा केंद्र सरकार असेल आपल्या अडचणी खंबीरपणे मांडून त्यातुन मार्ग काढणे या गोष्टी माझ्या जबाबदारीचा मुख्य भाग असेल.

गेली ३० वर्षेकोल्हापूर येथील व्यापार-उद्योग क्षेत्रात काम करीत असताना गेली ८ वर्षापासून पुणे येथे स्वत:चे व्यवसाय सांभाळण्याबरोबरच गेल्या २५ वर्षापासुन 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' च्या संचालक पदाच्या जबाबदारीबरोबरच गेली ५ वर्षे 'उपाध्यक्षपदाची' जबाबदारी यशस्वीपणे सांभाळत आहे. जकातविरोधी लढयात यशस्वीपणे सहभाग घेऊन 'ड' वर्ग महानगरपालिकांतील जकात बंद करण्यात यश मिळविले आहे. याबरोबरच वीज दरवाढ, लोड शेडींग, एमआयडीसी संबंधित प्रश्न याबाबतही विविध आंदोलनात पुढाकार घेतला आहे.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर' च्या गव्हर्निंग कौंन्सिल वर गेली आठ वर्षे सदस्य म्हणुन काम पाहात असताना, चेंबरच्या प्रत्येक उपक्रमात हिरीरीने सहभागही घेतला आहे. फुड सेफ्टी ॲक्ट मधील जाचक तरतुदीविरोधी सातत्याने आवाज उठवित आहे. चेंबरच्या माध्यमातुन संपुर्ण महाराष्ट्राची जकात रद्द करून घेण्यासाठी पुढाकार घेत आहे.

१९९६ पासुन कोल्हापूर येथील 'राजारामपूरी व्यापारी असोसिएशन' च्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना खंडणीसारखे प्रकार थांबविण्यासाठी आक्रमकपणे आंदोलन करून सरकारला गुन्हेगारांवर 'मोका' सारखी कारवाई करणे भाग पाडले. आज 'राजारामपूरी' ही कोल्हापूरातील सर्वात प्रगत व्यापारपेठ म्हणुन ओळखली जाते.

जकातविरोधी लढयासाठी स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र राज्य व्यापारी महासंघात' स्थापनेतुन सहभाग घेऊन 'उपाध्यक्ष' पदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली आहे.

महाराष्ट्र चेंबर, मराठा चेंबर, असोचेम, फीक्की, इंडियन मर्चंटस चेंबर या शिखर संस्थांच्या विविध शिष्टमंडळातुन शासन दरबारी व विविध देशांच्या उद्योग शिष्टमंडळाशी बैठकीत सातत्याने सहभाग घेतला आहे.

व्यापार- उद्योग क्षेत्रातील संघटनात्मक अनुभवाचा फायदा पश्चिम महाराष्ट्रातील व्यापार-उद्योगाच्या विकासासाठी व्हावा यासाठी मी आपली शिखर संस्था असलेल्या 'महाराष्ट्र चेंबर' च्या उपाध्यक्षपदावर काम करू इच्छितो.

आपण या पदावर मला संधी दिल्यास आपल्या अपेक्षा पुर्ण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेन तसेच 'महाराष्ट्र चेंबर' चे विभागीय कार्यालय 'पुणे' येथे सुरू करण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया पुर्ण करून घेण्याचाही विश्वास व्यक्त करून आपण मला संधी द्यावी अशी नम्र विनंती करतो.

सध्या राज्य व केंद्र सरकारच्या विविध नवीन धोरणांचा, नियमांचा व्यापार उद्योग क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर त्रास होत आहे. विशेषत: फूड सेफ्टी ॲक्टमधील जाचक तरतुदी, शॉप ॲक्ट कायद्यातील जाचक बदल व क्लीष्ट प्रणाली या प्रश्नांवर संबंधितांकडे दाद मागुन प्रसंगी लोकआंदोलने उभारून शासनाकडून या तरतुदीमध्ये सुधारणा करून घेणे आवश्यक आहे.

आपणा सर्वांच्या सक्रीय सहकार्याने या सध्याच्या ज्वलंत प्रश्नांवर मी आग्रहपूर्वक भूमिका घेऊन हे प्रश्न सोडविण्यासाठी ठोस प्रयत्न करण्याची ग्वाही देत आहे.

महाराष्ट्र राज्य सराफ व्यापारी महासंघाने अध्यक्ष श्री फत्तेचंदजी रांका यांच्या कुशल नेतृत्वाखाली केलेल्या अभुतपूर्व आंदोलनामुळे केंद्र सरकारला दागिण्यांवरील एक्साईज कर मागे घ्यावा लागला. आपल्या संघटीत शक्तीचे हे सर्वोत्तम उदाहरण आहे. श्री फत्तेचंदजी रांका व त्यांच्या सहकार्यांचे अभिनंदन करावे तितके कमी आहे.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेसह धन्यवाद.

**आपला सहकारी,**
ललित गांधी
संपादक

KCCI
कोल्हापूर चेंबर पत्रिका

## महाराष्ट्रातील रेल्वे संबंधीच्या विविध मागण्यांचा प्रस्ताव सादर



रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष एस. एस. खुराणा व त्रिपूराचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या बैठकीप्रसंगी स्वागत करताना चेंबरचे अध्यक्ष आनंद माने, उपाध्यक्ष ललित गांधी, संचालक युवराज ओसवाल व त्रिपूराचे चिफ सेक्रेटरी

**नवी दिल्ली**: कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे महाराष्ट्रातील रेल्वे संबंधीच्या विविध मागण्यांचे प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर - मुंबई सुपर फास्ट रेल्वे सुरू करणे, सह्याद्री एक्सप्रेसला प्रथम वर्गाचा डबा वाढविणे, कोल्हापूर - अहमदाबाद व कोल्हापूर - दिल्ली या दोन्ही सेवा आठवड्यातून पाच दिवस करणे, पूणे - कोल्हापूर रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण करणे, कोल्हापूर रेल्वे स्टेशनचे विस्तारीकरण करणे या प्रमुख प्रस्तावांचा समावेश आहे.

पश्चिम महाराष्ट्र - कोकण रेल्वेशी जोडण्यासाठीच्या प्रस्तावित मार्गाचा सर्वेक्षण यादीमध्ये समावेश केला जाईल असे स्पष्ट आश्वासन रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष एस.एस. खुराणा यांनी दिले. चेंबरचे अध्यक्ष आनंद माने यांनी सदर प्रस्तावित मार्ग हा कमीत कमी अंतराचा असून पावसाळ्यामध्ये कोकण रेल्वे मार्गावर अडथळे निर्माण होण्याच्या काळात पर्यायी मार्ग म्हणुन वापरता येणार असल्याचे सांगितले. उपाध्यक्ष ललित गांधी यांनी पश्चिम महाराष्ट्र - कोकण रेल्वेशी जोडल्याने प्रवाशी वाहतुकी बरोबर माल वाहतुकीमधुनही रेल्वेला मोठे उत्पन्न मिळणार असल्याचे सांगितले.

## कोल्हापूर विमानतळाला छत्रपती राजाराम महाराजांचे नांव देण्याची मागणी



कोल्हापूर : कोल्हापूर विमानतळाला ''छत्रपती राजाराम महाराजांचे'' नांव देण्याची मागणी करणारे निवेदन तत्कालीन उद्योगमंत्री नाम. राजेंद्र दर्डा यांना देताना चेंबरचे अध्यक्ष आनंद माने व उपाध्यक्ष ललित गांधी व पदाधिकारी

## पश्चिम महाराष्ट्रात मोठे उद्योग स्थापित करण्याबाबतचे निवेदन



**नवी दिल्ली** : पश्चिम महाराष्ट्रात केंद्र सरकारच्या मोठा उद्योग स्थापित करण्याबाबतचे निवेदन केंद्रीय अवजड उद्योग मंत्री नाम. प्रफुल्ल पटेल यांना देताना कोल्हापूर चेंबर चे उपाध्यक्ष ललित गांधी सोबत मा. मंत्री रमेशचंद्र बंग

**नवी दिल्ली**: केंद्र शासनाच्या अखत्यारांतील नवरत्न कंपन्यांचे नवीन प्रकल्प व मोठे उद्योग पश्चिम महाराष्ट्रातील अविकसित भागात स्थापित करावेत अशी मागणी करणारे निवदेन केंद्रीय अवजड उद्योगमंत्री नाम. प्रफुल्लजी पटेल यांना देण्यात आले. यावेळी चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी, मा. मंत्री रमेशचंद्र बंग आदि उपस्थित होते.

## व्यापार-उद्योगाच्या वाढीच्या दृष्टीने अखंडित विजपुरवठा ठेवण्याबाबत मागणी



केंद्रीय उर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्याशी चर्चा करताना कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष आनंद माने, उपाध्यक्ष ललित गांधी, सुरेंद्र जैन, संजय हुक्केरी, डॉ. गिरीश वझे, दिपक मिरजे आदि.

**कोल्हापूर** : विजेसंबंधी प्रश्नासंदर्भात कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष आनंद माने, उपाध्यक्ष ललित गांधी व पदाधिकारी यांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय उर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांना निवेदन दिले. कोल्हापूरच्या व्यापार-उद्योगाच्या वाढीच्या दृष्टीने अखंडित विजपुरवठा ठेवण्याबाबत व विमान संवेचे वेळापत्रक सर्वांना सोयीस्कर करण्याबाबतही संबंधितांना सुचना देण्यासंबंधी विनंती करण्यात आली.

कोल्हापूर-सोलापूर व पुणे या त्रिकोण व्यापार व उद्योग वाढीच्या दृष्टीने विकसित करण्यासाठी नाम. सुशिलकुमार शिंदे यांनी प्रयत्नशील राहु असे सांगितले.

KCCI
कोल्हापूर चेंबर पत्रिका

## बाजार समित्यांच्या प्रश्नासंबंधी मा. कृषिमंत्री यांना निवेदन



विशेष कृषि आर्थिक क्षेत्राची कोल्हापूरात स्थापना व बाजार समित्यांचे प्रश्नासंबंधी निवेदन कृषिमंत्री ना. विखे-पाटील यांना देऊन चर्चा करताना चेंबर चे उपाध्यक्ष ललित गांधी .

मुंबई - महाराष्ट्रातील कृषि पूरक उद्योग व अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विकासासाठी ''एसईझेड'' च्या धर्तीवर ''अेईझेड'' म्हणजेच ''विशेष कृषि आर्थिक क्षेत्र'' स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असुन राज्यात स्थापन होणाऱ्या ७ विशेष कृषि आर्थिक क्षेत्रापैकी एक विभाग पश्चिम महाराष्ट्रात स्थापन करावा अशी मागणी कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे उपाध्यक्ष ललित गांधी यांनी केली आहे.

पश्चिम महाराष्ट्र शेती उत्पादनामध्ये राज्यात अग्रेसर असुन येथील शेतकरी हा प्रयोगशील व कर्तृत्वत्वान आहे. नवीन ''कृषी आर्थिक क्षेत्रा''मुळे वेगवेगळ्या सवलती, प्रशिक्षण व अनुदानामुळे कृषि विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. तसेच कृषि पुरक उद्योग उभारणीला मोठी संधी मिळणार आहे. त्यामुळे हे केंद्र पश्चिम महाराष्ट्रात स्थापन होणे राज्याच्या कृषि क्षेत्राच्या व उद्योगाच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात 'अेईझेड' ची स्थापना झालीच पाहीजे अशी आग्रही मागणी ललित गांधी यांनी कृषी मंत्र्यांकडे केली.

राज्यातील बाजार समित्यांमध्ये व्यापार करणाऱ्या व्यापारी वर्गास भेडसवणा-या विविध अडचणी तात्काळ दुर कराव्यात अशी आग्रही मागणी ललित गांधी यांनी यावेळी कृषि व पणन मंत्र्यांकडे केली.

## स्थानिक स्वराज्य संस्था करातील अडचणींबाबत निवेदन



स्थानिक स्वराज्य संस्था करातील अडचणीबाबत नगरविकास राज्यमंत्री भास्कर जाधव यांना निवेदन देवून चर्चा करताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी




कोल्हापूरः चेंबर आयोजित 'जकात हटाव' चर्चासत्राप्रसंगी मार्गदर्शन करताना गृह राज्यमंत्री सतेज पाटील,मा. आम. मालोजीराजे, चेंबरचे अध्यक्ष आनंद माने, सुरेंद्र जैन आदि.



कोल्हापूरः चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजच्या वतीने जकात रद्द करण्यासाठी काढलेला भव्य मोर्चा

## फुड सेफ्टी ॲक्ट मधील जाचक तरतुदी रद्द करण्याबाबतचे निवेदन



कोल्हापूर : फुड सेफ्टी ॲक्ट मधील जाचक तरतुदी रद्द करण्याबाबतचे निवेदन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व गृह, अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री मा. नाम. सतेज उर्फ बंटी पाटील यांना देवुन चर्चा करताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी, अध्यक्ष आनंद माने सोबत जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख, तत्कालीन आयुक्त विजय सिंघल.

## कोल्हापूर येथे आय. टी. क्षेत्राच्या विस्तारासाठी निवेदन



इन्फोसिस चे संस्थापक मा. नारायण मूर्ती यांना निवेदन देताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी सोबत जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख,

**कोल्हापूर –** आय. टी. क्षेत्रातील प्रकल्प सुरू करण्यासाठी आवश्यक किमान मुलभुत सुविधा उपलब्ध झाल्यास इन्फोसिस कोल्हापूरमध्ये आपला विस्तार करण्याचा निश्‍चित विचार करेल असे आश्‍वासन ''इन्फोसिस'' चे संस्थापक व आय.टी.क्षेत्रातील जागतिक स्तरावरील दिग्गज नारायण मुर्ती यांनी दिले.

जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व क्रीडाई यांच्या शिष्टमंडळाने नुकतीच कोल्हापूर येथे नारायण मूर्ती यांची भेट घेऊन कोल्हापूर येथे आय. टी. क्षेत्राच्या विस्तारासाठी व त्यांच्याशी चर्चा केली त्याप्रसंगी ते बोलत होते.

चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी यांनी कोल्हापूरातील रस्ते प्रकल्प पूर्णत्वाकडे असून दर्जदार शाळाही उपलब्ध आहेत. विमान सेवा या महिन्यात सुरू होत असुन, पंचतारांकीत हॉटेल ही लवकरच सुरू होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे ''इन्फोसिस'' सारख्या कंपन्यांनी कोल्हापूर येथे येण्याचा निर्णय घेतल्यास अन्य सुविधा उपलब्ध होण्यासाठीही चेंबर, क्रिडाई व जिल्हा प्रशासन पुढाकार घेईल.

यावेळी झालेल्या चर्चेत जेष्ठ अणुशास्त्रज्ञ शिवराम भोजे, उद्योगपती किरण पाटील, दिलीप मोहिते, क्रिडाई अध्यक्ष राजीव परिख, गोशिमाचे योगेश कुलकर्णी यांनी सहभाग घेतला.

## ''महाराष्ट्र चेंबर'' च्या अध्यक्षपदी श्री आशिष पेडणेकर यांची बिनविरोध फेरनिवड



'महाराष्ट्र चेंबर' च्या अध्यक्षपदी श्री आशिष पेडणेकर यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल यांचे पुष्पगुच्छ देवुन अभिनंदन करताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी

**मुंबई–** महाराष्ट्रातील व्यापार–उद्योग क्षेत्राची शिखर संस्था म्हणुन कार्यरत असलेल्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इन्डस्ट्रीज व ॲग्रीकल्चर' (MACCIA) च्या अध्यक्षपदी श्री आशिष पेडणेकर यांची बिनविरोध फेरनिवड झाली आहे. त्यांच्यानिवडीबद्दल मन:पूर्वक अभिनंदन




**कोल्हापूर :** चेंबर ऑफ इंडस्ट्रीज व राजारामपूरी व्यापारी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्यापार–उद्योग–वाहतुकदार विकास परिषदेत मार्गदर्शन करताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी सोबत श्रीमंत छत्रपती शाहु महाराज, चेंबरचे अध्यक्ष आनंद माने



**कोल्हापूर :** रूपांतरीत कर रद्द करण्याच्या मागणीसाठी काढलेल्या मोर्चाचे नेतृत्व करताना ललित गांधी.




**कोल्हापूर :** पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पुरक उद्योग विकासासाठी आयोजित परिषदेचे मार्गदर्शन करताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी सोबत प्रदिपभाई कापाडीया, राजेंद्र मालु, चेंबरचे अध्यक्ष आनंद माने, पोपटलाल ओस्तवाल, दिनेश बुधले, सुरेंद्र जैन इत्यादी मान्यवर.

KCCI
कोल्हापूर चेंबर पत्रिका




कोल्हापूर : चेंबर ऑफ कॉमर्स, आयकर बार असोसिएशन व कोल्हापूर चार्टर्ड अकौंटन्सी सोसायटी द्वारा आयोजित आयकर विषयक कार्यशाळेप्रसंगी बोलताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी सोबत मुख्य आयकर आयुक्त एस. के. झा, संजय पात्रा, जे. सुरेश, कोल्हापूर आयकर आयुक्त के. सत्यनारायण, चेंबरचे अध्यक्ष आनंद माने.




कोल्हापूर : आयकर सेवा केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी सोबत आयकर आयुक्त (अपील) राहुल कर्ण, विभागीय मुख्य आयकर आयुक्त एस. जी. जोशी, आयकर आयुक्त एल.आर.सिंह व कोल्हापूरच्या आयकर आयुक्त पुष्पलता श्रीवास्तव.



कोल्हापूर : विभागीय मुख्य आयकर आयुक्त एस.जी.जोशी यांच्या सत्काराप्रसंगी चेंबरचे अध्यक्ष आनंद माने, उपाध्यक्ष ललित गांधी व आयकर आयुक्त एल.आर.सिंह

## चालू महिन्यात व पुढील महिन्यातील काही दिवसांत विविध कायद्यांप्रमाणे जी दक्षता घ्यावी लागते त्याची माहिती

**१२ मे, २०१२** ▸ एम्प्लॉइज स्टेट इन्शुरन्स ॲक्ट प्रमाणे तीन प्रतीत वर्गणी जमा केल्याची माहिती चलनासह फॉर्म नं. ५ (जुना फॉर्म नं. ६) मध्ये दाखल करा.

**१५ मे, २०१२** ▸ एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड स्कीमप्रमाणे वर्गणी जमा करणे.
▸ मार्च २०१२ ला संपणाऱ्या तिमाहीसाठी पगारातून करकपातीचे (टी.डी.एस.) पत्रक फॉर्म २४ क्यू, व्याज, भाडे, व्यावसायिक फी, कॉन्ट्रॅक्टरला पेमेंट, कमिशन किंवा ब्रोकरेज इत्यादीमधून करकपातीचे पत्रक फॉर्म क्र. २६ क्यू मध्ये आणि मुळातून कर वसुलीचे (टी.सी.एस.) पत्रक फॉर्म २७ ईक्यूमध्ये दाखल करावे.

**२१ मे, २०१२** ▸ व्हॅट आणि मध्यवर्ती विक्रीकर कायद्याप्रमाणे एप्रिल २०१२ चे मासिक पत्रकाप्रमाणे कर भरावा.
▸ व्हॅट कायद्याखाली एप्रिल २०१२ चा टी.डी.एस. भरणा.
▸ एम्प्लॉइज स्टेट इन्शुरन्स ॲक्टप्रमाणे वर्गणी जमा करणे.

**२५ मे, २०१२** ▸ एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड स्कीमप्रमाणे रिटर्न फॉर्म नं. ५,१०,१२ ए मध्ये दाखल करणे.

**३० मे, २०१२** ▸ मार्च २०१२ ला संपणाऱ्या तिमाहीचे टीडीएस सर्टिफिकेट फॉर्म नं. १६ए मध्ये आणि टी.सी.एस. सर्टिफिकेट फॉर्म नं. २७ डी मध्ये द्या.

**३१ मे, २०१२** ▸ आर्थिक वर्ष २०११-२०१२ मध्ये मालकाने कर्मचाऱ्याच्या पगारातून मुळातून करकपात केली असल्यास त्याचे वार्षिक टीडीएस सर्टिफिकेट फॉर्म नं. १६ मध्ये कर्मचाऱ्याला देणे.
▸ लक्झरी टॅक्स कायद्याखाली एप्रिल २०१२ चे मासिक पत्रक दाखल करावे.
▸ व्यवसायकर कायद्याखाली मे २०१२ चे मासिक पत्रक दाखल करावे.

**५ जून, २०१२** ▸ मे २०१२ साठी मासिक सेवाकर भरावा.
▸ मे महिन्याची एक्साईज रक्कम भरावी.(लघुउद्योजकांखेरीज)

**७ जून, २०१२** ▸ मे २०१२ मध्ये मुळातून करकपात केलेली रक्कम (टी.डी.एस.) आणि मुळातून कर वसुली केलेली रक्कम (टी.सी.एस.) सरकार खाती भरावी.
▸ आकारणी वर्ष २०१३-२०१४ साठी मे २०१२ मध्ये मिळालेले आयकराचे फॉर्म नं. १५ एच/१५ जी दाखल करावे.

**१०जून,२०१२** ▸ एक्साईज रिटर्न फॉर्म एठ-१/एठ-२ मे २०१२ भरावे.

**१५जून,२०१२** ▸ कंपनी करदात्यांनी आकारणी वर्ष २०१३-२०१४ साठी भरावयाच्या आगाऊ आयकराचा १५% पहिला हप्ता भरावा. (ॲडव्हान्स इन्कमटॅक्स हप्ता) एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड स्कीमप्रमाणे वर्गणी भरणे.

**२१जून,२०१२** ▸ व्हॅट आणि मध्यवर्ती विक्रीकर कायद्याप्रमाणे मे २०१२ चे मासिक पत्रकाप्रमाणे कर भरावा. हॅट कायद्याखाली मे २०१२ चा टी.डी.एस. भरणा. एम्प्लॉइज स्टेट इन्शुरन्स ॲक्टप्रमाणे वर्गणी जमा करणे.

**२५जून,२०१२** ▸ एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड स्कीमप्रमाणे मासिक पत्रक फॉर्म ५,१०,१२ए मध्ये दाखल करणे.

**३०जून,२०१२** ▸ व्हॅट कायद्याखाली ११-१२ चे टी.डी.एस. चे वार्षिक पत्रक फॉर्म ४०५ मध्ये दाखल करणे.

## ''छत्रपती राजाराम समाजगौरव'' पुरस्कारांचे वितरण



''राजारामपूरी व्यापारी असोसिएशन' चे 'छत्रपति राजाराम समाजगौरव पुरस्कार', जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख, प्रा. सुरेश शिरोडकर, सचीन शिरगांवकर, यांना प्रदान करताना श्रीमंत शाहू महाराज व अन्य मान्यवर

**कोल्हापूर :** ''राजारामपूरी व्यापारी असोसिएशन'' तर्फे छत्रपति राजाराम महाराजांच्या जयंतिनिमित्त प्रतिवर्षी दिले जाणाऱ्या ''छत्रपति राजाराम समाजगौरव पुरस्कार'' वितरण समारंभ 'पायाभूत सुविधा विकास' गटातील पुरस्कार जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांना, 'उल्लेखनीय सामाजिक कार्य' गटातील पुरस्कार प्रा. सुरेश शिरोडकर यांना तर 'उद्योजकता विकास' गटातील पुरस्कार सचीन शिरगांवकर यांना श्रीमंत शाहू महाराज व मुख्य जिल्हा न्यायाधिश पी.आर.बोरा. यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

समारंभास प्रमुख पाहुणे म्हणुन मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. आर. बोरा, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष आनंद माने, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अजित मोहिते यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. आर. बोरा यांनी 'राजारामपूरी व्यापारी असोसिएशन' ने व्यापार विकासाबरोबरच जपलेली सामाजिक बांधिलकी गौरवपूर्ण असल्याचे सांगुन ते म्हणाले 'न्यायालयात न्याय मागणाऱ्या लोकांची लोकन्यायालयाविषयी मते जाणून घेतली तर ती फारशी चांगली नाहीत त्यामुळे तडजोडीने खटले निकाली निघणे आवश्यक आहे. न्याय मागण्यासाठी इतर कोणतीही दुसरी यंत्रणा नसल्याने लोक न्यायालयात येतात. मात्र जर खटलेच निकाली निघत नसतील तर पुण्या - मुंबईत न्याय देणारी पर्यायी यंत्रणा उभी राहात आहे. त्याप्रमाणे कोल्हापूरातही अशी यंत्रणा तयार होण्याची भीती आहे.

अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रास्ताविक करताना समाजासाठी आपले योगदान देणाऱ्या गुणवंतांचा सत्कार हा सर्वांनी त्यांच्या कार्याची प्रेरणा घ्यावी यासाठीच असतो असे सांगुन असोसिएशन या वर्षी व्यापारवृध्दीसाठी ग्राहकांसाठी प्रोत्साहन योजना सामूहिकपणे राबविणार असल्याचे जाहीर केले. ग्राहकांना या परिसरात जास्तीत जास्त चांगली सेवा मिळावी व उत्तम दर्जाचा माल मिळावा यासाठी असोसिएशन विशेष प्रयत्नशील असल्याचे सांगितले. १९३९ साली कोल्हापूरात विमानतळ सुरू करण्याची दुरदृष्टी ठेवणारे छत्रपति राजाराम महाराजांचे नाव विमानतळाला देण्यासाठी आपण प्रयत्नशिल असल्याचे सांगुन हा विमानतळ लवकरात लवकर सुरू व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

जेष्ठ विधिज्ञ अरविंद शहा, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. शिवाजीराव चव्हाण, कोल्हापूर जिल्हा बार असो. अध्यक्ष ॲड. अजित मोहीते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विधि सेवा प्राधिकरण चे सचिव व्ही.डी.निंबाळकर तसेच उपाध्यक्ष सुरेंद्र जैन उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील व्यापार-उद्योग क्षेत्राच्या विविध मागण्यासंबंधी राष्ट्रीय स्तरावरील प्रयत्न



**नवी दिल्ली :** 'असोचेम' चे नवनिर्वाचित अध्यक्ष खास. राजकुमार धुत यांचे स्वागत करताना ललित गांधी.



'असोचेम' च्या भेटी वेळी डी.एस.रावत, खास. राजकुमार धुत, स्वाती पिरामल, दिलीप मोदी व अन्य मान्यवरां समवेत ललित गांधी.

**नवी दिल्ली** - महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात सातत्य राखण्यासाठी व देशात औद्योगिक विकासामध्ये महाराष्ट्राचे अव्वल स्थान कायम राहावे यासाठी 'असोचेम' या राष्ट्रीय शिखर संस्थेचे पुढकार घेऊन महाराष्ट्रातुन नवीन गुंतवणुक वाढीसाठी विशेष योजना राबवाव्यात तसेच सध्याच्या उद्योगधंद्यांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांचा आढावा घेऊन केंद्र शासनस्तरावरील समस्यांच्या सोडवणुकीसाठी विशेष प्रयत्न करावेत अशी मागणी कोल्हापूर चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी यांनी 'असोचेम' चे नवनिर्वाचित अध्यक्ष खासदार राजकुमार धुत यांचेकडे केली.

यावेळी असोचेम च्या पदाधिऱ्यां समवेत महाराष्ट्रातील प्रश्नांसंबंधी सविस्तर चर्चा केली तसेच नवनिर्वाचित अध्यक्ष खासदार राजकुमार धुत यांचा राज्याच्या वतीने सत्कार केली.

वर्ष :४ ◆ अंक :१ ◆ मे २०१२ ◆ पान नं : ८

# कोल्हापूर चेंबर पत्रिका

R.N.I. REGN.NO. MAHMAR/2009/36262
POSTING DATE : 10TH OF EVERY MONTH
RAJARAMPURI POST OFFICE, KOLHAPUR
POSTAL : REGN. NO. KLP-302/2012-2014

## व्यापार-उद्योग क्षेत्रातील संघटनात्मक कार्यातील माझा सहभाग

### कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इन्डस्ट्रीज (स्थापना १९८२)

– कोल्हापूर जिल्ह्यातील ३६००० व्यापारी, उद्योजकांची शिखर संस्था
–जिल्ह्याच्या व्यापारी,उद्योग,पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी महत्वपूर्ण भुमिका
– धोरण निर्धारण करण्यासाठी सरकारद्वारा नियमित विचारविनिमयासाठी सहभागिता
– व्यापार–उद्योग क्षेत्राच्या समस्यांचे समाधान करण्यासाठी विविध आंदोलने

### माझी जबाबदारी

१९९०–९५ – संचालक, १९९६–२००६ – एक्झिक्युटीव्ह कमिटी डायरेक्टर, २००७–२००९ – ऑनररी सेक्रेटरी, २००९ पासून आजपर्यंत – उपाध्यक्ष
– राज्य तथा केंद्र सरकारच्या विविध विभागांच्या संयुक्त विद्यमाने विविध सेमिनारचे यशस्वी आयोजन
– रेल्वे विकासासाठी प्रमुख भुमिका

### इंडियन मर्चंटस चेंबर (IMC) (स्थापना १९०७)

– महात्मा गांधी यांचे सदस्यत्व असलेले देशातील एक अग्रेसर चेंबर
– पासुन आजतागायत सदस्य

### असोचेम (ASSOCHAM)

देशातील सर्व चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इन्डस्ट्रीज ची शिखर राष्ट्रीय संस्था 'असोचेम' चे निरंतर सदस्य

### महाराष्ट्र राज्य व्यापारी महासंघ

– जकात रद्द करण्याच्या आंदोलनात सहभाग
– उपाध्यक्ष म्हणुन कार्यरत

### महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इन्डस्ट्रीज अॅन्ड अॅग्रीकल्चर (स्थापना– १९२७)

– महाराष्ट्रच्या व्यापार, उद्योग व व्यवसाय क्षेत्राची शिखर संस्था.
– महाराष्ट्राच्या व्यापार उद्योगाच्या विकासासाठी निरंतर कार्यरत.
– राज्याच्या व्यापार–उद्योग धोरणामध्ये प्रमुख भूमिका.
– विविध देशातील सरकारांचा उद्योग क्षेत्रांमध्ये सहभाग
– गर्व्हनिंग कौन्सिल सदस्य म्हणुन गेली वर्षे कार्यरत

**माझी जबाबदारी** – २००७ पासून सतत संचालक पदावर कार्यरत.

### राजारामपूरी व्यापारी असोसिएशन (स्थापना १९९६)

– संस्थापक अध्यक्ष – १९९६ पासून सलग १५ वर्ष अध्यक्ष पदाच्या जबाबदारीचे यशस्वी कार्यावहन.
– कोल्हापूर सर्वात मोठी व्यापारी संघटना.
– 'राजारामपूरी' तील १६०० व्यापाऱ्यांच्या अग्रेसर संस्था.
– व्यापार वृध्दीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन
– परिसरात होणाऱ्या वाहतुक तथा दहशत थांबवण्यासाठी स्थापना.
– असामाजिक तत्व व गुंडाविरूध्द तीव्र आंदोलन.
– जीव धोक्यात टाकून मुख्यमंत्र्यांचे वाहन थांबवुन त्यांच्या समोर निदर्शने केली. दोन वर्षाच्या तीव्र आंदोलनानंतर संपुर्ण यश प्राप्त
– आज शहरातील सर्वात मोठे अग्रेसर व्यापारी केंद्र



**नवी दिल्ली:** महाराष्ट्रातील जकात व एलबीटी रद्द करून त्याचा ''जीएसटी'' मध्ये समावेशनासाठी ना. सुशीलकुमार मोदी यांना निवेदन देताना कोल्हापूर चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी व खासदार दिलीप गांधी.



**कोल्हापूर :** केंद्रीय कृषीमंत्री नाम. शरद पवार यांचा सत्कार करताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी, सुरेंद्र जैन, प्रदिपभाई कापडिया आदि.

प्रेषक :
कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज
कल्पतरू प्लाझा, १०८६/ए/१०४, ई वार्ड,
पहिला मजला, राजाराम रोड,
हेमकिरण डिझेल्ससमोर,
कोल्हापूर – ४१६००८

प्रति,

Printed & Published by Shri Lalit Gandhi on behalf of "Kolhapur Chamber of Commerce & Industries" Printed at Sakal Papers Ltd., D-4, M.I.D.C, Shiroli, Kolhapur 416122 and published from Business House, 1677, E, Main Road, Rajarampuri 10th Line, Kolhapur 416008. Ph.: 0231-2525251, Fax: 0231-2522201 Printer/Publisher/Editor: Lalit Gandhi